
शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर
विद्वत्प्रमाणित, यू.जी.सी. मान्यताप्राप्त त्रैमासिक
(Peer Reviewed Refered Research Journal )
ISSN No. 2319-6025

# शिविम संशोधन पत्रिका

## अधिवेशन विशेषांक

### कविता : रूप आणि आविष्कार

वर्ष सहावे • अंक अकरावा, बारावा व तेरावा • जुलै २०१७ ते मार्च २०१८




''स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद''-कर्मवीर
रयत शिक्षण संस्थेचे

**बळवंत कॉलेज, विटा**

ता.खानापूर, जि.सांगली
नॅक तृतीय मूल्यांकन : A ग्रेड (CGPA - 3.11)
।। पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग ।।

| | | |
|---|---|---|
| • ऊलगुलान आणि गोधड काव्यसंग्रहातील स्त्रीवादी अभिव्यक्ती | केशव धोंडीबा टिपरसे | २६५ |
| • मध्ययुगीन मराठी साहित्येतिहासाचे स्वरूप व दुर्लक्षित कवी कविंद्रसेवकाची कविता | डॉ. गोमटेश्वर पाटील | २७१ |
| • मराठी कवितेतील समकालिनता : स्थूल परिचय | डॉ. युवराज देवाळे | २७९ |
| • मराठी कवितेचा रुपबंध | डॉ. अनिल गवळी | २८५ |
| • कविता : काव्यशास्त्रीय अभ्यास | डॉ. उदय जाधव | २८९ |
| • सुरेश भटांच्या गझलेचे रूप - आविष्कार | प्राचार्य डॉ. सौ. सुलक्षणा कुलकर्णी<br>डॉ. सविता अशोक माळी | २९५ |
| • समकालीन मराठी ग्रामीण कवितेतील स्त्रीविश्व | डॉ. चंद्रकांत भगवंत पोतदार | ३०३ |



ISSN No. 2319-6025

# सुरेश भटांच्या गझलेचे रूप – आविष्कार

**मार्गदर्शक – प्राचार्य डॉ. सौ. सुलक्षणा दिलीप कुलकर्णी**

एम.बी.एस.क. कन्या महाविद्यालय, कडेगाव

**अभ्यासक – डॉ. सविता अशोक माळी**

मानवाने आज अनेक क्षेत्रामध्ये जी उत्तुंग भरारी घेतलेली आहे, ती केवळ कलेच्या जोरावरच. या कलांमुळेच मानवी जीवनामध्ये आनंद निर्माण झाला आहे. साहित्यनिर्मिती ही एक कला असून त्यापैकी एक म्हणजे काव्यनिर्मिती होय. सरस काव्यनिर्मिती करून स्वत: सौंदर्य निर्मितीचा आनंद लुटायचा आणि रसिकांना तो लुटू द्यावयाचा असे कवीचे दुहेरी उद्दिष्ट असते. ताल, लय, नाद, छंद हे कवितेचे मुलभूत घटक आहेत. कविता ही कमीतकमी शब्दात विस्तृत अनुभव सांगत असते. संत काव्य, पंडिती काव्य, शाहिरी काव्य, अर्वाचीन काव्य, नवकाव्य याप्रमाणेच खंडकाव्य, भावगीत, सुनीत, उद्देशिका; हायकू, गझल इ. पोटभेद कल्पिले जातात. यातील गझल या काव्य प्रकाराचा विशेषत: सुरेश भटांच्या गझलांचा विचार आपण करणार आहोत.

आजच्या युगात इतर काव्यप्रकारांपेक्षा गझल या काव्यप्रकाराला लोकप्रियता लाभलेली आहे. सर्वच वर्गात या काव्यप्रकाराचे आकर्षण वाटते. लग्नसमारंभ, कथा कीर्तन, रंगेल मैफिली, सहली यासर्व प्रसंगाच्या निमित्ताने गझलांचे स्वर कानात घुमू लागतात. तसेच गझल हा गेय व श्राव्य काव्यप्रकार असल्याने संगीताच्या क्षेत्रात त्याला स्वतंत्र गायन प्रकार – संगीत प्रकार म्हणून ओळखण्यात येते.

''लावणी व पोवाडा ही ज्याप्रमाणे वाचायची कविता नसून ती पाहण्याची व ऐकण्याची कविता आहे. त्याप्रमाणेच गझलेचे सौंदर्यही 'मुशायरा' किंवा 'मैफिल' यामध्येच आढळते. म्हणून डॉ. सुधीर रसाळ यांनी गझल ही वाचायची कविता नसून ती ऐकायची कविता आहे.''[१] असे म्हटले आहे. गझल हा ही आधुनिक काव्यप्रकार आहे. तिची श्रवणीयता, श्रोत्यांवर होणारा परिणाम, श्रोत्यांची मिळणारी दाद यावर आहे. काव्यसंग्रहातील गझल वाचण्यापेक्षा गझलकाराच्या तोंडून ऐकलेली गझल श्रोत्यांना – रसिकांना अधिक जवळची वाटते यात शंका नाही. बराचसा आशय रसिकाला प्रत्यक्ष गझल वाचनातून व गायनातून समजतो.

१) 'गझल' चे विविध अर्थ –

'गजल' ह्या शब्दाचा वाच्यार्थ प्रणयगीत किंवा प्रेयसीस उद्देशून काढलेले उद्‌गार होय. उर्दू व हिंदी कोशामध्ये 'गझल' ह्या शब्दाचे पुढील अर्थ दिलेले आढळतात "फारसी और उर्दू में एक प्रकार की कविता"[२], "प्रेमिका से वार्तालाप, उर्दू-फारसी कविता का एक प्रकार की जिसमें पाँच से ग्यारह शेर होते हैं ।"[३], "फार्शी वृत्तांत लिहिलेले एकयमकी प्रेमगीत"[४].

२) 'गझल' विषय –

'गझल' या शब्दाचा अर्थच असा आहे की, प्रेमालाप करणे, प्रेयसीस उद्देशून बोलणे आतापर्यंत केलेल्या अभ्यासावरून व व्याख्यावरून असे लक्षात येते की, गझलचा प्रमुख विषय प्रेम व शृंगार एवढाच मर्यादित आहे. परंतु हा विचार तितकासा योग्य नाही. कारण गझलमध्ये अनेक विषय हाताळता येतात. मात्र त्या विषयाची अभिव्यक्ती ही गझलवृत्तांत असावी लागते. म्हणूनच गझलला विषयाचे बंधन नसून गझलविषयीच्या नियमांचे बंधन आहे.

विषयाच्या दृष्टीने गझलांचा विचार केला असता असे दिसते की, प्रतिथयश कवींनी गझलांची रचना विपुल केली असली तरी विषयाची विविधता मात्र त्यांच्यात आढळत नाही. अंत:करणात उसळणाऱ्या उत्कट भावनांचे आविष्कारण करण्यासाठी गझलांचा उपयोग होत असतो. हर्ष, खेद, आनंद, उद्वेग, कृतज्ञता, संयम व स्वैराचार, संतोष व असमाधान, राग-द्वेष, न्याय-करुणा, आशा-निराशा, प्रिती, उत्सुकता, देशप्रेम व ईशप्रेम, राष्ट्रनिष्ठा व धर्मनिष्ठा हे व यासारखे अनेक आळविण्यासाठी कवींनी गझलांचा उपयोग केला आहे.

गझलमध्ये एकच भाव वा विषय असता कामा नये. गझलच्या प्रत्येक शेरात वेगवेगळे विषय वा भाव असले पाहिजेत असा सुरेश भटांचा फारच आग्रह आहे. ते म्हणतात, "गझलेच्या फॉर्ममध्ये उलगडत जाणारी सलग कविता लिहिली जाऊ शकते; पण ती कविताच गझल नव्हे."[५]

**३) सुरेश भटांची गझल –**

'गझल' हा काव्यप्रकार अठराव्या शतकाच्या पूर्वाधापासून जरी मराठीत आला असला तरी त्यामध्ये उणिवा होत्या. माधव ज्युलियननांनी गझल या काव्यप्रकाराची ओळख महाराष्ट्राला करून दिली. १९२० ते १९६५ या काळात अनेक कवींनी गझल लिहिण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. या काळातील गझल माधव ज्युलियन पद्धतीची अधिक प्रमाणात दिसते. मराठीत परिपूर्ण गझल आणली ती सुरेश भटांनी. सु. रा. चुनेकर म्हणतात, "आजची तंत्रशुद्ध, खरीखुरी गझल सुरेश भटांपासून सुरू झालेली आहे; तर कालची काहीशी उणिवांनी डागाळलेली गझल अमृत-मोरोपंत व माधव ज्युलियन यांच्यापासून सुरु झालेली आहे.[६]

 ISSN No. 2319-6025

१९६५ नंतर मात्र सुरेश भटांसारखा यशस्वी, मराठी गझलला प्रतिष्ठा मिळवून देणारा 'गझल सम्राट' मिळाला. 'गझलयुग' निर्माण करण्याचे श्रेय त्यांना जाते. मराठी गझल त्यांनीच सामर्थ्यशाली बनविली. हे निर्विवाद सत्य आहे. सुरेश भटांनी आपल्या गझलांमधून मराठी संस्कृती, नीतिनियम, रुढी, धर्मसंकेत इ. चा वापर केला आहे आणि मराठी गझल मराठी रूपात इतकी बेमालूम सजवली की, ती परकीय आहे असे वाटतच नाही. योजलेल्या प्रतिमा, कल्पना, शब्द, वाक्प्रचार, म्हणी इ. ऐवज गझलेमध्ये ठाकून-ठोकून बसविलेले वाटत नाही, तर ते स्वेच्छेने आपल्या स्थानग्रहणासाठी धावून आलेले वाटतात.

एकांतिका, आत्मपूजा आणि समाजाभिमुखता यातूनच भावून, हळव्या ओळींना भटांनी जन्म दिला. मनाचे कोमलपण, नाजुकपण जेवढ्या मधाळ व रसाळपणे ते चित्रित करतात. तेवढ्याच ताकदीने ते समाजव्यवस्थेच्या विरूद्ध शब्दांचे शस्त्र हाती घेताना दिसतात. त्यांची कविता खऱ्या अर्थाने माणसाची कविता आहे.

सुरेश भटांचे एकूण पाच काव्यसंग्रह आहेत. त्या काव्य संग्रहामध्ये सुरूवातीला गझलचे प्रमाण कमी होते. मात्र हळूहळू त्यामध्ये वाढ झाल्याचे दिसून येते 'रूपगंधा' (१५ मार्च १९६१), 'रंग माझा वेगळा' (१९७४), 'एल्गार' (१९८३), 'झंझावात' (१९९४), 'सप्तरंग' (२००२) या त्यांच्या काव्यसंग्रहामध्ये गझल विखुरलेल्या आढळतात. उर्दू गझलांप्रमाणे बंदिस्त रचना व बेबंद भावना यामुळे त्यांच्या गझला 'वृत्त आणि वृत्ती' या दोन्ही बाबतीत आकर्षक, मोहक व चित्तवेधक बनल्या आहेत. शिवाय त्या गेय असल्याने आज तळागाळापर्यंत पोहोचल्या आहेत. अर्थपूर्ण शब्दांतून आपले जीवनभाष्य व भावना व्यक्त करणे, शब्दसामर्थ्याचा चातुर्याने उपयोग केल्याने त्यांच्या ग़झला आशयघन, कल्पनारम्य व भावरम्य बनल्या आहेत. त्यांच्या गझला सुशिक्षितांमध्ये जेवढ्या प्रिय आहेत तेवढ्याच त्या अशिक्षितांमध्ये व सामान्य लोकांच्यात प्रिय आहेत आणि इथेच सुरेश भटांचा विजय आहे.

माधव ज्युलियनांनी 'गज्जल' हा शब्द मराठीला परिचित करून दिला असला तरी त्यांना हा शब्दच मान्य नाही. या शब्दांप्रमाणेच माधव ज्युलियनांचे गझलविषयक असणारे विचार भटांना मान्य नाहीत. सुरेश भट म्हणतात, ''माझा अवतार होण्यापूर्वी 'गझल' हा शब्द 'गज्जल' म्हणून माधवरावांनी महाराष्ट्राला परिचित करून दिला. मी साधारणत: ५५-५६ च्या सुमारास गझला लिहू लागलो. तोपर्यंत माझ्या दृष्टीपथात त्यांचे पुस्तक आले नव्हते. जेव्हा ते नजरेस आले आणि मी ते चाळले तेव्हा गझलांचा संग्रह म्हणून वाचायच्या लायकीचे ते पुस्तक नाही हे माझ्या लक्षात आले.''[७] भावगीत ज्याप्रमाणे उलगडत जाते; त्याप्रमाणे गझल उलगडत नाही. गझलमध्ये प्रत्येक शेर स्वयंभू-स्वतंत्र असतो. भावगीत व गझल यामधील फरक पटवून देण्यासाठी भट एक उदाहरण देतात,

*'जितके जगावयाचे तितके जगून झाले*
*फिरते उगीच जाते जगणे दळून झाले'*

माधवराव गझलला भावगीत समजतात. भावगीत व कविता यामध्ये फरक आहे. कवितेत मुखडा नसतो. गीतात मुखडा असतो, अंतरा नसतो, पण गीतात अंतरा असतो. गीतात अंतऱ्यानंतर मुखड्याला जोडणारी एक ओळ असते. गझल ही कविता आहे. गझलला जर भावगीत म्हटले तर गझलेचे खरे गमक म्हणजे गझलेतील प्रत्येक शेर स्वतंत्र असतो. एक क्लोज युनिट असते ते गझल उलगडत नसते. कारण तिला ''थीम'' नसते. (महाराष्ट्र साहित्य पत्रिका पृ. १२)

**४) गझलचा आकृतिबंध –**

१. संबंधित गझलेचे वृत्त (बहर), यमक (काफिया) आणि अंत्ययमक (रदीफ) असल्यास अंत्ययमक या घटकांमुळे गझलेचा आकृतिबंध निश्चित होतो. या आकृतिबंधालाच ''जमीन'' असे म्हणतात.

२. गझलच्या सुरूवातीपासून शेवटपर्यंत एकच वृत्त कायम असते.

३. गझलच्या पहिल्याच शेरात तिचा आकृतिबंध, तिची 'जमीन' स्पष्ट होते. कारण पहिल्या शेरात गझलेचे वृत्त, यमक आणि अंत्ययमक स्पष्ट होते.

४. गझल शेवटपर्यंत एकाच वृत्तात चालत असली तरी तिच्या फक्त पहिल्या शेराच्या दोन ओळीत यमक आणि अंत्ययमक येते. नंतर येणाऱ्या प्रत्येक शेराच्या दुसऱ्या ओळीतच यमक व त्यानंतर अंत्ययमक येते.

५. गझलेतील अंत्ययमक (रदीफ) गझल संपेपर्यंत बदलत नाही. गझलात अंत्ययमक नसते, पण ज्या गझलेत अंत्ययमक असते. त्या गझलेत ते अंत्ययमक शेवटपर्यंत कायम राहते. एका शेरात एक अंत्ययमक तर दुसऱ्या शेरात दुसरे अंत्ययमक असा हास्यास्पद प्रकार गझल खपवून घेत नाही.

६. गझलमध्ये यमक उर्फ काफिया बदलत नाही. तर त्याचे शब्द बदलतात. यमकाच्या शब्दात असलेली 'अलामत' उर्फ 'स्वरचिन्ह' हेच त्या यमकाचे स्थायी गमक असते. या अलामतीवरच त्या यमकाचे जीवन अवलंबून असते.

७. यमकाच्या उर्फ काफियाच्या शेवटच्या न बदलणाऱ्या एका अक्षराआधी किंवा एकाहून अधिक अक्षरांआधी किंवा एकाहून अधिक अक्षरांआधी येणाऱ्या एका विशिष्ट अक्षरात जो न बदलणारा स्वर असतो त्यालाच 'स्वरचिन्ह' किंवा 'अलामत' म्हणतात.

उदा. –

*''हा ठोकरून गेला, तो वापरून गेला,*
*जो भेटला मला, तो वांदा करून गेला''*

(एल्गार, पृ. २७)

वरील शेरात 'ठोकरून, वापरून, करून' अशी यमके उर्फ काफिया आलेले आहेत. एकाच ओळीत दोन यमके चालू शकतात. जर आपण यमकाचे बारकाईने निरीक्षण केले तर आपणास असे आढळून येईल की, 'ठोकरून, वापरून, करून' या तिन्ही यमकात 'रून' ही शेवटची अक्षरे बदलत नाहीत. मात्र त्याआधी येणाऱ्या 'ठोकरून' मधील 'क' या अक्षरात, 'वापरून' या यमकातील 'प' या अक्षरात आणि पुन्हा 'करून' या अक्षरात हटकून 'अ' हा स्वर आलेला आहे. क्वचित 'अ' च्या जागी ऱ्हस्व 'इ' किंवा 'उ' हा स्वर वापरला जातो. परंतु तो अपवाद समजावा.

८. मराठी गझलेसाठी आवश्यक असणाऱ्या प्रतिमा, रूपके आणि संकेत महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वातावरणात भरपूर आहेत. मराठी गझलला मराठी मातीचा सुगंध आला पाहिजे.

९. शेर सहज समजावा आणि ऐकणाराच्या आणि वाचणाऱ्याच्या थेट हृदयात शिरावा अशी शब्दांची मांडणी असावी. जणू आपण बोलत आहोत असा शेर असावा. सोपेपणा हे यशस्वी शेराचे रहस्य आहे.

१०. शेरातील दोन्ही ओळींचा परस्परांशी संबंध असलाच पाहिजे. शेर म्हणून परस्परांशी संबंध नसलेल्या दोन सुंदर ओळी एकत्र लिहिल्या म्हणजे शेर होत नाही. शेरात जे काही सांगायचे आहे त्याची प्रस्तावना पहिली ओळ असते. तर दुसरी ओळ म्हणजे त्या प्रस्तावनेचा प्रभावी समारोप असतो.

११. गझलमधील शेर विरोधाभासावर (Paradox) आधारित असतात ही समजूत पार चुकीची आहे. स्थलाभावी नमुन्यादाखल सुरेश भटांचा एक शेर पहा.

उदा. – *''संपल्यावर खेळ माझ्या आंधळ्या कोशिंबिरीचा*
*लोक मज दिसले अचानक ; मी कुठे दिसलोच नाही''*

भटांनी सांगितलेल्या गझलविचाराला आधार घेतला आहे. 'गझलेची बाराखडी' या 'युवकमुद्रा' या सुरेश भट लिखित दिवाळी अंकातील प्रकरणाचा.

**सुरेश भटांच्या गझलांच्या आशयातील विविधता –**

**१) प्रेमभावना व्यक्त करणाऱ्या गझल –**

गझल मुख्य विषय म्हणजे 'प्रेम'. गझलेचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे शृंगार. जीवनधारणेइतकीच त्यांची प्रेमधारणाही सुंदर व समर्थ आहे. सफल व विफल प्रीतीची भावनोत्कट चित्रे त्यांनी कमालीच्या हळूवारतेने व कल्पनारम्यतेने रंगविली आहेत. त्यात देह सौंदर्याची मादकता आहे, मिलनाची धुंदी आहे. विरहातील, अतृप्तीतील आर्तता आहे. भटांच्या प्रेमविषयक आशय असणाऱ्या गझल पहा.

*''अमृतमय मी, अमृतमय तू, तनमन अमृत बनते गं,*

*अमृतमय श्वासात आपल्या अमृतनभ थरथरते गं !''*

(रंग माझा वेगळा)

*''आताच अमृताची बरसून रात गेली*
*आताच अंग माझे विझवून रात गेली ''* (झंझावात)

*''वाटले काही म्हणावे, तू पुढे आल्यावरी*
*बोलण्याआधीच माझे बोलणेही संपले''*

**२) सामाजिक आशय असणाऱ्या गझल –**

सुरेश भटांच्या गझलांमध्ये कवींचे आयुष्य आणि आजचा समाज यांची बोलकी चित्रे आणि त्यांच्या संदर्भात कवीने केलेली भाष्येच आहेत असे नाही तर खऱ्या अर्थाने ती हृदयाचा ठाव घेणारी वास्तवदर्शी समाजचित्रेच आहेत.

'भविष्य' या गझलमध्ये त्यांनी भविष्याची बतावणी केली आहे. वर्तमानात केलेल्या चुकांचा परिणाम भविष्यात भोगावा लागतो. हे जीवन विषयक तत्त्वज्ञानही ते सांगतात. आपल्यावर अन्याय झाल्यावर कोणत्या न्यायालयात जावं ? हा कवीला प्रश्न पडला आहे. कारण पूर्वीच्या रामशास्त्रीसारखे न्यायदाते आता राहिले नाहीत. ही खंत 'रक्त' या गझलमध्ये व्यक्त केली आहे.

*''कोणत्या न्यायालयी मी न्याय मागायास जाऊ ?*
*मी जिथे गेलो, तिथे 'रामशास्त्री' चरत होते.''*

*''ही न्यायमंदिरे फसवी, लटिकाच न्याय सोयीचा ...*
*सारेच तराजू खोटे आधीच कुणा विकलेला !''*

(सप्तरंग, पृ. ४६)

**३) आत्मचिंतनपर आशय असणाऱ्या गझल –**

जगातील प्रत्येक जीव आत्मप्रेमी असतो. त्याचे स्वतःवर प्रेम असते. तो स्वतःवर नुसतेच प्रेम करीत नाही तर त्याला त्याचा अभिमान वाटतो. सुरेश भटांनी त्यांना आलेले अनुभव गझलमधून व्यक्त केले आहेत. दुःख, संकटे, यातना, वैफल्य, उपेक्षा, दुर्दैव हा त्यांच्या आत्मचिंतनपर गझलांचा आत्मा आहे.

एका प्रश्नाच्या लाख उत्तरांमुळे निर्माण झालेली संभ्रमावस्था कवीने 'एक साधा प्रश्न माझा' या गझलमध्ये व्यक्त केली आहे.

*''एक साधा प्रश्न माझा, लाख येती उत्तरे !*
*हे खरे की ते खरे की, ते खरे की हे खरे ?''*

आपल्या वेगळेपणाची झालेली तीव्र जाणीव 'रंग माझा वेगळा' या गझलमध्ये व्यक्त केली आहे.

 ISSN No. 2319-6025

*"रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा !*
*गुंतुनी गुंत्यात साऱ्या पाय माझा वेगळा !"*
(रंग माझा वेगळा)

आत्मचिंतनपर आशय असणाऱ्या गझलांमधून सुरेश भटांनी ढोंगी, खोट्या लोकांवर प्रहार केलेला जरी दिसत असला तरी ते सर्वसामान्य लोक आहेत. त्यांच्याविषयी कणव आहे. असे हे प्रतिभावंत व भावनाशील भट आत्मचिंतनपर आशय असणाऱ्या गझलांमधून पहायला मिळतात.

**४) निसर्गचित्रणपर आशय असणाऱ्या गझल –**

निसर्गचित्रण असणाऱ्या गझलांची संख्या खूप कमी आहे. निसर्गचित्रणाबाबत सुरेश भट म्हणतात, "निसर्ग हा माझी प्रेरणा नव्हतीच कधी. माझा संबंध जगण्याशी आणि माणसाशी होता. माणूस आणि मानवी संबंध हीच माझी प्रेरणा. त्यामुळे निसर्गचित्रणाचा मोह मी टाळत आहे. असे म्हणणे योग्य होणार नाही. गझलेला निसर्गाचे काही वावडे नाही. गझलकाराला विषयाचे संपूर्ण स्वातंत्र्य असते. केवळ निसर्गाच्याच नव्हे तर कोणत्या प्रेरणा गझलकारांनी दाबून टाकू नयेत असे माझे मत आहे.[८]

याशिवाय राजकीय, आशय असणाऱ्या, देशभक्तीपर आशय असणाऱ्या, आध्यात्मिक आशय असणाऱ्या, प्रासंगिक आशय असणाऱ्या गझला भटांनी लिहिल्या आहेत. त्यांनी गझलमधून समाजातील विसंगती, दंभ, ढोंग, अन्याय, विफलता यांची त्यांनी चांगली अभिव्यक्ती केली आहे. संपन्न भावुक मन व त्यांच्या सभोवतालचे स्वार्थी जग यातील विरोध व संघर्ष यांचे ते नाट्यमय चित्रण करतात.

**निष्कर्ष –**

१) सूक्ष्म भावाविष्कार हे सुरेश भटांच्या गझलेचे महत्वाचे वैशिष्ट्य आहे.
२) सुरेश भटांच्या गझलांमध्ये असलेला नाट्यपूर्ण विरोधाभास हे भटांच्या गझलेचे वेगळेपण आहे.
३) भटांनी आपल्या गझलांमधून प्रेमभावना, सामाजिक, आत्मचिंतनपर, राजकीय आशय असणाऱ्या अशा विविध विषयामध्ये भावना व्यक्त केल्याचे दिसते. त्यांच्या गझलांमध्ये विपुलताच नव्हे तर विविधताही आहे.
४) सामाजिक आशय व्यक्त करणाऱ्या गझलांमध्ये भट समाजातील वर्गसंघर्ष, सत्तासंघर्ष चित्रित करतात.
५) सुरेश भटांच्या गझलला मिळालेले मराठीपण मिळाले आहे ते त्यांनी वापरलेल्या म्हणी व वाक्प्रचारामुळे, आपले अनुभवविश्व व्यक्त करण्यासाठी वाक्प्रचार, पौराणिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक संदर्भ, प्रतिके, प्रतिमा व वैशिष्ट्यपूर्ण शब्दप्रयोग यांचा वापर करतात.

**संदर्भ ग्रंथ सूची –**

१. गझल : रंग आणि गंध, प्रा. डॉ. राजशेखर हिरेमठ, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, १९८९, पृ. ५

२. मराठी गझल : १९२० ते १९८५, प्रा. डॉ. अविनाश कांबळे, निहारा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १२ जून १९९५.

३. उर्दू–हिंदी शब्दकोश, संपा. श्रीपाद जोशी, नितीन प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती, पृ. १७७.

४. फार्शी–मराठी शब्दकोश, संपा. कै. माधव त्रिंबक पटवर्धन, वरदा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, जून १९२५, पृ. ५३.

५. गझल : रंग आणि गंध, प्रा. डॉ. राजशेखर हिरेमठ, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, १९८९, पृ. ५

६. गझलधारा, प्रा. डॉ. अविनाश कांबळे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९९४.

७. महाराष्ट्र साहित्य पत्रिका, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ पुरस्कृत, दिवाळी अंक (गझल विशेषांक) १९८६, पृ. १०.

८. नत्रैव, पृ. ८.

■■

 ISSN No. 2319-6025